महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.ac.in

क्रमांक कशिमं/२०२५/पाच/771 दिनांक :- ०७.०८.२०२५

वाचावे : १) पत्र क्रमांक कशिमं/२०२५-२६/पाच/५८१, दिनांक २५ जून, २०२५.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एडीआर-२०२५/CN-११८२७३२/प्र.क्र.७४/तांशि६, दिनांक १४ जुलै, २०२५.

३) परिपत्रक क्रमांक कशिमं/२०२५/पाच/२५०, दिनांक :- १५.०७.२०२५

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत बालचित्रकला स्पर्धा २०२५ चे आयोजन मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ रोजी राज्यातील सर्व जिल्हा परिषद/नगरपालिका/ महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळामध्ये इयत्तानिहाय ४ गटामध्ये एकाच दिवशी आयोजित करावयाची आहे. **सदर स्पर्धेस जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा याकरिता केंद्र/शाळेची नोंदणी व विद्यार्थी नोंदणी करिता दिनांक १० ऑगस्ट, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. स्पर्धा शुल्क दिनांक १० ऑगस्ट, २०२५ रात्री ११.५९ पर्यंत भरता येईल. त्यानुसार स्पर्धेच्या अनुषंगाने केंद्र/शाळेंना महत्वाच्या सूचना खालील प्रमाणे.**

१. बालचित्रकला स्पर्धा २०२५ चार गटामध्ये सर्व केंद्र/शाळेवर दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ रोजी एकाच दिवशी घ्यावयाची आहे.
२. सदर परीक्षेचे प्रवेशपत्र, प्रश्नपत्रिका व गटनिहाय याद्या दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी सर्व केंद्र/शाळेच्या लॉगइनवर ऑनलाईन उपलब्ध होईल. गोपनियतेची जबाबदारी संबंधित केंद्र /शाळेची राहील.
३. स्पर्धेच्या गटनिहाय प्रश्नपत्रिका संबंधित केंद्र / शाळांना ऑनलाईन (प्रत्येक केंद्र/शाळा करिता एक) उपलब्ध करुन देण्यात येतील व तद्नंतर संबंधित वर्गातील पर्यवेक्षकांने गटनिहाय प्रश्नपत्रिकेचा विषय परीक्षेच्या वेळी फळ्यावर (Black board) लिहून देणे बंधनकारक राहील.
४. स्पर्धकांना ११ इंच X १५ इंच आकाराचा कागद (ड्रॉईग पेपर) संबंधित केंद्र /शाळांनी पुरविणे आवश्यक राहील.
५. स्पर्धकांनी स्वत:चे रंग (क्रेयॉन, जलरंग, पोस्टर कलर), ब्रश व इतर चित्रकला साहित्य यांच्या सहाय्याने दोन तासात चित्र पूर्ण करणे आवश्यक राहिल.
६. स्पर्धा पार पाडल्यानंतर चित्रांचे गटनिहाय वर्गवारी करुन गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करणे.

बालचित्रकला स्पर्धे विषयी आवश्यक सर्व माहिती https://www.msbae.ac.in या संकेतस्थळावरील बालचित्रकला या टॅबमध्ये व या https://balchitrakala२०२५.msbae.in लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(विनोद रं. दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रति,

१) केंद्र प्रमुख (सर्व), बालचित्रकला स्पर्धा २०२५.
२) केंद्र प्रमुख (सर्व), शासकीय रेखाकला परीक्षा २०२५.
३) मुख्याध्यापक/ प्राचार्य (सर्व) ,जिल्हा परिषद/नगरपालिका/महानगरपालिका/अनुदानित/ विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळा.

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
४) आयुक्त, परीक्षा परिषद, पुणे.
५) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
७) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
८) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/(प्राथमिक), जिल्हापरिषद (सर्व)
९) शिक्षणाधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका (सर्व)
१०) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई.
११) प्राचार्य, संगीत आणि कला अकादमी, कला विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, शिक्षण विभाग, मुंबई.
१२) निवड नस्ती.